महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर ४१६ ००४

---

क्र.कोविमं/माध्य.गोप./परीक्षा /६६सपोच
दिनांक :०९/०१/२०१९

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर

विषय:-माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च२०१९ तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेचे गुणतक्ते भरणेबाबतच्या व साहित्य वितरणाबाबतच्या सुचना.

संदर्भ:- राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा -६/ दिनांक २६/११/२०१८ चे पत्र

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(इ.१०वी) परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०१९ ला प्रविष्ठ विज्ञान व गणित प्रात्यक्षिक परीक्षा व श्रेणी परीक्षेचा तसेच तंत्र व पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा लेखी परीक्षापूर्वी म्हणजेच सोमवार दिनांक ११/०२/२०१९ ते गुरूवार दिनांक २८ /०२/२०१९ आणि आऊट ऑफ टर्न ( out of Turn ) प्रात्यक्षिक परीक्षा शनिवार दिनांक २३ मार्च २०१९ व सोमवार दिनांक २५ मार्च २०१९ या कालावधीत आयोजीत करण्यात याव्यात..मंडळाची वेबसाईट www.sscboardkolhapur.in ही आहे,या परिपत्रकासोबत प्रात्यक्षिक /तोंडी परीक्षेचे साहित्य देण्यात येत आहे.

मार्च २०१९ या प्रात्यक्षिक /अंतर्गत/तोंडी (Practical / Internal / Oral ) परीक्षेसाठी ICR/ OMR या पध्दतीने गुणतक्ते देण्यात येत आहेत. त्या अनुषगांने गुणतक्ते भरताना Scanning योग्यरितीने होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) प्राप्त गुण बैठक क्रमांक( seat no ) समोर दिलेल्या चौकटीतच सुवाच्च अक्षरात भरावे व त्या अनुषंगाने समोरील OMR चे वर्तुळ काळ्या/निळ्या ( Blue / Black ) शाईने भरावे.
२) बारकोडवर काहीही लिहू नये.सही करू नये.
३) सदर OMR शीटला फोल्ड/स्टेपल करू नये.
४) गुणपत्रिका( Marklist ) भरताना OMR चे वर्तुळ भरलेले आहे व खाली Page Total केलेली आहे याची खातरजमा करून घेण्यात यावी.
५) नवीन अभ्यासक्रम फक्त गणित व विज्ञान विषयांचे गुणतक्ते काळजीपूर्वक भरण्यात याव्यात.
६) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांचा फक्त भाषा व सर्व विषयाच्या तोंडी परीक्षा असतील त्यांचे गुणतक्ते व्यवस्थित भरून देण्यात यावेत.
७) सदर देण्यात येणाऱ्या OMR पध्दतीच्या गुणपत्रिकेमध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये.
८) गुणपत्रिकेमध्ये असलेल्या छापील बैठक क्रमांकाची एकूणातील गुणात नोंद घ्यावी.गुणपत्रिकेमध्ये अतिरिक्त बैठक क्रमांक अथवा विषय बदल घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या बैठक क्रमांकाची नोंद करून स्वतंत्ररित्या गुणतक्ते वरील गुणतक्त्या सोबत पाठविण्यात यावेत.

| | माध्यमिक शाळा क्रमांक | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | विषयाचे नाव | विषय सांकेतीक क्रमांक | बैठक क्रमांक | मिळालेले गुण |

१) वरील प्रमाणे गुणतक्ते भरण्याची कार्यवाही करावी.
२) श्रेणी,तोंडी,पूर्व व्यावसायिक परीक्षा,अंध व अपंगासाठी कार्यानुभव,तंत्र व पूर्व व्यवसायिक प्रात्यक्षिक परीक्षा गुणतक्ते साहित्याचे वितरण करण्यात येईल तसेच सदरचे तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य परीक्षा झाल्यानंतर शाळानी वितरण केंद्रावर दिनांक ०२/०३/२०१९ रोजी न चुकता जमा करावे.
३) शाळांकडून जमा झालेले साहित्य वितरण केंद्रप्रमुखांनी मंडळाच्या प्रतिनिधीकडे दिनांक ०४/०३/२०१९ रोजी जमा करावे. सदर दिनांकास मंडळाचे वाहन आपल्या केंद्रावर साहित्य स्विकारण्यास येईल याची नोंद घ्यावी.
४) सदरचे साहित्य जमा करण्यासाठी सांगली व सातारा वितरण केंद्रप्रमुखानी दिनांक ०५ /०३/२०१९ रोजी सकाळी११-०० वाजता कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यालयात उपस्थित रहावे.
५) कोल्हापूर जिल्हातील गडहिंग्लज, कासारवाडा ,जयसिंगपुर या वितरण केंद्रप्रमुखांनी जमा झालेले साहित्य देण्यासाठी दिनांक ०६ /०३/२०१९ रोजी ११-०० वाजता विभागीय मंडळात उपस्थित रहावे.

६) कोल्हापूर शहर,कागल,करवीर,पन्हाळा,गगनबावडा,शाहूवाडी या तालुक्यातील शाळांनी तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य दिनांक ०२ /०३/२०१९ रोजी मंडळ कार्यालयात जमा करावे.

७) आऊट ऑफ टर्न ने झालेल्या परीक्षेचे साहित्य संबधित शाळांनी दिनांक २६ /०३/२०१९ रोजी मंडळात चलनासह हस्तपोच जमा करावे.

उपरोक्तप्रमाणे घ्यावयाच्या परीक्षांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | परीक्षेचा तपशील | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| १) | लेखी परीक्षा | दिनांक ०१-०३-२०१९ ते २२-०३-२०१९ |
| २) | श्रेणी/तोंडी परीक्षा | दिनांक ११-०२-२०१९ ते २८-०२-२०१९ |
| ३) | पुर्व व्यावसायीक परीक्षा | दिनांक ११-०२-२०१९ ते २८-०२-२०१९ |
| ४) | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यानुभव विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा १) नियमित परीक्षार्थ्यांसाठी<br>२) पुनर्परीक्षार्थ्यांसाठी | दिनांक २५-०३-२०१९ ते ०३-०४-२०१९<br>दिनांक २५-०३-२०१९ ते १६-०४-२०१९ |
| ५) | तंत्र व पूर्व व्यवसायिक प्रात्यक्षिक परीक्षा | दिनांक ११-०२-२०१९ ते २८-०२-२०१९ |
| ६) | आऊट ऑफ टर्न परीक्षा | दिनांक २३-०३-२०१९ व २५-०३-२०१९ |

सदर परीक्षेसाठी खालील सुचनानुसार कार्यवाही करावी :

१) विज्ञान व तंत्रज्ञान या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार प्रचलित पध्दतीने घेण्यात येईल.

२) नियमित दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कार्यनुभव विषयांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा दिनाक २५-०३-२०१९ ते ०३-०४-२०१९ तसेच पुनर्परीक्षार्थ्यांची कार्यनुभव विषयांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २५-०३-२०१९ ते १६-०४-२०१९ या कालावधीत विद्यार्थी संख्येनुसार संबंधित शाळा मुख्याध्यापक यांनी आपल्या स्तरावरून प्रचलित कार्यपध्दतीनुसार आयोजित कराव्यात.

३) वर नमूद केलेल्या विषयांव्यतिरिक्त अन्य कार्यानुभवाचे विषय घेवून विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाला असल्यास वरील निर्धारीत कालावधीतच सदर विषयांची परीक्षा आयोजित करावी.

४) विद्यार्थी संख्येनुसार शाळानी उपरोक्त नमूद केलेल्या कालावधीत दिनांक (११-०२-२०१९ ते २८-०२ २०१९) तोंडी परीक्षा/श्रेणी परीक्षा घेणे, संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वीच विद्यार्थ्यांना अवगत करण्याची दक्षता घ्यावी.

५) शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा सोमवार दिनांक ११-०२-२०१९ ते गुरूवार दिनांक २८-०२-२०१९ रोजी आयोजित करण्यात यावी.

६) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१९ च्या प्रात्यक्षिक परीक्षेचे संबंधित विषयाची तोंडी परीक्षा व श्रेणी परीक्षा नमूद दिनांकासच आयोजन करावे. सदर परीक्षेचे वेळापत्रक संबंधित शाळांनी विभागीय मंडळाकडे परीक्षेपूर्वी पाठवावे. त्यानुसार सदर परीक्षा कालावधीत विभागीय मंडळाचे भरारी पथक शाळेना भेटी देतील..

७) तंत्र व पूर्व व्यवसायिक प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक ११-०२-२०१९ ते २८-२-२०१९ कालावधी दरम्यान आयोजित करण्यात याव्यात.

८) <u>वितरण केंद्रावर आपल्या शाळेचे साहित्य जमा करतेवेळी उत्तरपत्रिका पाकिट, गुणपत्रिका पाकिट ,ग्रेड लिस्ट पाकिट, स्वतंत्र जमा करण्यात यावे.</u>

**महत्वाचे**

|| <u>प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेबाबतच्या सूचना</u> ||

१) सर्व विद्यार्थ्यांची विज्ञान विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार नव्याने घ्यावयाची आहे. कोणत्याही परिस्थितीत अशा विद्यार्थ्याचे जुने गुण कळवू नयेत.

२) गणित, सामान्य गणित व समाजशास्त्र या विषयासाठी मार्च २०१८ परीक्षेपूर्वीचा विद्यार्थी मार्च २०१९ च्या परीक्षेस प्रविष्ठ होणार असेल तर सदर विषयाच्या अंतर्गत मूल्यमापन परीक्षेसाठी त्याची प्रचलित असणारी स्वाध्यायपुस्तिका सोडवून घेवून त्याचे प्राप्त गुण गुणपत्रिकेत नोंदवावेत.

३) मार्च २०१८ परीक्षेचा विद्यार्थी मार्च २०१९ परीक्षेस प्रविष्ठ होणार असेल तर त्याचे गणित, सामान्य गणित व समाजशास्त्र या विषयाचे मागील परीक्षेचे गुण नोंदवावेत.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर